# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


**दिनांक १५/०१/२०२५ (बुधवार) दुपार**

---

**रात्रगस्त दरम्यान कोबींग ऑपरेशन राबवुन केले रेकॉर्डवरील गुन्हेगार चेक,हददपार आरोपी, अवैध हत्यार बाळगणारे आरोपी, दारू बाळगणारे आरोपी यांच्या वर गुन्हे नोंद. एक पाहीजे आरोपी ताब्यात**

मा. श्री हर्ष ए. पोद्दार ,पोलीस अधिक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या आदेशाने पोलीस स्टेशन खापरखेडा हद्दीत वलनी, सिल्लेवाडा, खापरखेडा येथे दिनांक १४/०१/२०२५ चे २३:०० वा. ते दिनांक १५/०१/२०२५ चे ०५:०० वा. दरम्यान कोबींग ऑपरेशन राबविण्यात आले. कोबींग ऑपरेशन हे उपविभागिय पोलीस अधिकारी कन्हान उपविभाग श्री संतोष गायकवाड यांचे नेतृत्वात करण्यात आले. कोबींग ऑपरेशन करीता पोलीस स्टेशन खापरखेडा चे पोलीस निरीक्षक श्री अरविंदकुमार कतलाम,पोहवा मुकेश वाघाडे,प्रफुल राठोड, प्रदीप मने,शैलेश यादव,पोलीस नाईक राजु भोयर आणि RCP पथकाचे अंमलदार असे हजर होते. कोंबींग ऑपरेशन दरम्यान वलनी, सिल्लेवाडा, खापरखेडा भागात पैदल पेट्रोलींग केली. तसेच त्या भागातील रेकॉर्डवरील गुन्हेगार चेक करून त्यांचे घराची पंचासमक्ष घरझडती घेण्यात आली.सदर कोबींग दरम्यान खालील कारवाई करण्यात आली आहे.

१.आरोपी **नामे साहील उर्फ बुटऱ्या कैलास बागडे, रा. वार्ड क्र १,खापरखेडा** याला मा. श्री हर्ष ए. पोद्दार ,पोलीस अधिक्षक नागपुर ग्रामीण यांच्या आदेशाने नागपुर ग्रामीण आणि नागपुर शहर हददीतुन हददपार करण्यात आले होते परंतु त्याने शासनाची कोणतीही परवानगी न घेता हददपार आदेशाचे जाणीवपुर्वक उल्लंघन केल्याने आरोपी विरूध्द पोलीस स्टेशन खापरखेडा महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम १४२ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

२. आरोपी **नामे हेमंत उर्फ सुदामा मधुकर चापडहाके, रा वार्ड क्र २,खापरखेडा** याला मा. श्री हर्ष ए. पोद्दार ,पोलीस अधिक्षक नागपुर ग्रामीण यांच्या आदेशाने नागपुर ग्रामीण आणि नागपुर शहर हददीतुन हददपार करण्यात आले होते परंतु त्याने शासनाची कोणतीही परवानगी न हददपार आदेशाचे जाणीवपुर्वक उल्लंघन केल्याने आरोपी विरूध्द पोलीस स्टेशन खापरखेडा महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम १४२ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

३. कोबिंग दरम्यान **दत्तदेव रज्जुराव तेलंगणे,वय २१ वर्षे रा इंदीरा नगर आबादी,खापरखेडा** याचे घराची पंचासमक्ष घरझडती घेतली तो घरी मिळुन आला. सदर आरोपीला नागपुर ग्रामीण आणि नागपुर शहर हददीतुन हददपार करण्यात आले आहे परंतु त्याने शासनाची कोणतीही परवानगी न हददपार आदेशाचे जाणीवपुर्वक उल्लंघन तसेच त्याचे घरातुन २ तलवारी प्रत्येक किंमती ५०० /— रूपये एकुण १००० /— रूपयाचा मुददेमाल जप्त करण्यात आाला असुन आरोपीवर महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम १४२ सह कलम ४/२५ भारतीय हत्यार कायदा अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

४.आरोपी **योगेश रमेश दुरबुडे रा वार्ड क्र ३ खापरखेडा** याचे ाराची पंचासमक्ष घरझडती घेतली असता त्याचे घरातुन ५० निप देशी दारू किंमती ७० /— रू प्रमणे एकुण ३५००/— रूपयाचा मुददेमाल जप्त करण्यात आाला असुन आरोपीवर ६५ ई म.दा.का. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

५.पोलीस स्टेशन खापरखेडा येथे दाखल असलेल्या मोटार सायकल चोरीच्या गुन्हयातील पाहीजे आरोपी नामे **इरफान न्यामुल खान** रा वार्ड क्र ४,खापरखेडा हा कोबिंग दरम्यान मिळुन आल्याने त्याला अटक करण्यात आली आहे.

# नायलॉन मांजा विक्री करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद

पोस्टे सावनेर:— दिनांक १४/०१/२०२५ रोजी पोस्टे सावनेर येथील स्टाफ पोस्टे हद्दीत पेट्रोलींग करीत असता मौजा पहिलेपार, सावनेर परिसरात **आरोपी नामे— हर्ष शंकर आमगावकर रा वय २१ वर्ष वार्ड क्र १६ पहलेपार सावनेर जि. नागपूर** हा पतंग उडविण्यासाठी तयार करण्यात येणारा नायलॉन मांजा निर्मिती, विक्री, व वापर बाबत बंदी बाबत आदेश जारी केले असतांना देखील त्याने वरील ठिकाणी नायलॉन मांजा विक्री करीत असतांना मिळून आल्याने त्याने महाराष्ट्र शासनाचे आदेशाने उल्लंघन करून सार्वजनिक उपद्रव केला आणि गुरांना पक्ष्यांना व मानवी जिवीतास तीव्र इजा होण्याचा धोका निर्माण केला असून आरोपी यांचे कृत्य कलम ५, १५ पर्यावरण संरक्षण अधिनियम १९८६, सहकलम २२३ बी.एन.एस २०२३ अन्वये गुन्हा नोंद केला आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**